५. मला वाटते

- ऐका. म्हणा. वाचा.



मला वाटते झरा होउनी
तृषा हरावी वाटसरूंची
मला वाटते मेघ होउनी
वृष्टि करावी जलधारांची. ।।१।।

मला वाटते तरुवर होउनी
फळे गोड सगळ्यांना द्यावी
सदैव शीतल छाया धरुनी
वाटसरूंची सोय करावी. ।।२।।

मला वाटते गवत होउनी
पुष्ट करावे गाइगुरांना
आणि वाटते दिवा होउनी
उजेड द्यावा मी सकलांना. ।।३।।

मला वाटते फूल होउनी
डोलावे मी तरुवेलींवर
हासत हासत सुगंध उधळत
सुखवावे सकलांचे अंतर. ।।४।।

– मधुकर बारस्कर



शब्दार्थ : तृषा हरणे– तहान भागणे. **वाटसरू–** पथिक, वाटेने जाणारा. **वृष्टी–** पाऊस. **पुष्ट–** बळकट. **उधळत–** पसरवत. **सुखावणे–** आनंद देणे. **अंतर–** मन.

स्वाध्याय



प्र. १. एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) कवीला झरा आणि ढग का बनावेसे वाटते?

(आ) कवीला झाड बनून वाटसरूंची कोणती सोय करायची आहे?

(इ) गाईगुरांना पुष्ट करण्यासाठी कवी कोण बनणार आहे?

(ई) कवी दिवा बनून कोणते कार्य करू इच्छितात?

(उ) फूल बनून कवी दुसऱ्यांना कशी मदत करणार आहे?

प्र. २. कवितेत शेवटचे अक्षर सारखे असणाऱ्या शब्दांच्या जोड्या शोधून लिहा.

प्र. ३. कंसात दिलेल्या शब्दांपैकी दोन-दोन समानार्थी शब्द यादीतून शोधून लिहा.

(घन, वर्षा, पथिक, पाऊस, तरू, पुष्प, पांथस्थ, सुमन, झाड, ढग)



प्र. ४. कवीला कोण कोण बनावेसे वाटते आणि काय काय करावेसे वाटते ते 'अ' व 'ब' गटात दिले आहे. त्याच्या योग्य जोड्या लावा.

कोण बनावेसे वाटते.	**काय काय करावेसे वाटते.**
'अ' गट	**'ब' गट**
(१) झरा-	फळे व सावली द्यावी.
(२) मेघ-	सगळ्यांना सुगंध द्यावा.
(३) तरू-	तहान भागवावी.
(४) गवत-	गाईगुरांना चारा द्यावा.
(५) दिवा-	सगळ्यांना प्रकाश द्यावा.
(६) फूल-	पाऊस पाडावा.

प्र. ५. परोपकारी गोष्टी/वस्तू आणि व्यक्ती यांचे वर्गीकरण करा व लिहा.

(दिवा, समाजसेवक, वृक्ष, क्रांतिकारक, ढग, सैनिक, नदी, डॉक्टर)

परोपकारी गोष्टी/वस्तू	**परोपकारी व्यक्ती**

प्र. ६. 'मी वारा झालो तर...!' काय काय करेन ते चार-पाच वाक्यांत लिहा.

प्र. ७. 'गाईगुरे' या जोडशब्दात गाई व गुरे असे दोन समान अर्थाचे शब्द आहेत. असे दोन्ही अर्थपूर्ण शब्द असलेले जोडशब्द वाचा व त्यांचा अर्थ समजून घ्या.

कागदपत्र, कामकाज, बाडबिस्तरा, कपडालत्ता, धनदौलत, थट्टामस्करी, दंगामस्ती, मेवामिठाई, बाजारहाट, अक्कलहुशारी, दागदागिने, नोकरचाकर.

उपक्रम :

(१) पावसाळ्यात येणाऱ्या ढगांचे निरीक्षण करा. त्यांचे आकार, रंग, आवाज यांबाबत माहिती लिहा.

(२) एखादा वाटसरू तुमच्या घरी पाणी मागायला आला, तर तुम्ही त्याच्याशी काय संवाद कराल ते पाच-सात ओळींत लिहा.